
2018-19

## काव्यप्रेमी शिक्षक मंच प्रकाशित
## प्रातिनिधिक काव्यसंग्रह












Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

रत्नप्रिया प्रकाशन
सोलापूर

ISBN- 978-81-938796-2-7

# अष्टाक्षरी प्रातिनिधिक कवितासंग्रह




# अष्टाक्षरी

प्रातिनिधिक कवितासंग्रह

संपादक

प्रा. सत्येंद्र राऊत



रत्नप्रिया प्रकाशन
सोलापूर

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

# संपादकीय

एखाद्या कवितेची निर्मिती कशी होते याचे उत्तर देणे सर्वार्थाने कवीलाही शक्य होत नाही. एखादा स्फोट व्हावा किंवा एखाद्या झऱ्याने जन्म घ्यावातितक्या सहजपणे व अनपेक्षितरीत्या कवितेचा जन्म होऊ शकतो, असे कवी म्हणतात. त्यामागे त्याचे निरीक्षण, त्यांचा अभ्यास व मुख्य म्हणजे त्यांचे प्रतिभासामर्थ्य असते. कविता निर्मितीसाठी नाद, लय या सारख्या घटकांचा विचार आवर्जून केला जातो. कवितेतून विविध अर्थ सुचविण्याची क्षमता निर्माण होत असते. कोणतीही चांगली कविता वाचत असताना असे लक्षात येते की, कमीत कमी ओळीत शब्दांचा वापर करुन जे सांगायचे आहे ते फापटपसारा टाळून, वर्णने टाळून सांगितली जाते. कविता हे उत्कृष्ट भावनांचे उत्स्फूर्त प्रकटीकरण असते. कवींच्या जीवनानुभवाची समृध्दता व विचाराची व्यापकता हे कवितेच्या आशयाची खोली आणि उंची वाढवत असते.

'अष्टाक्षरी' प्रातिनिधिक काव्यसंग्रह या सुंदर मथळ्याखाली प्रकाशित होत असलेल्या या काव्यसंग्रहात व्हाट्सअॅप ग्रुप काव्यप्रेमी शिक्षक मंचच्या माध्यमातून ९३ कवींनी सहभाग नोंदविला असून हा काव्यसंग्रह काव्यप्रेमींसाठी मेजवानीच ठरेल या संग्रहात अनेक शिक्षक व्यावसायिक, विद्यार्थी व नवोदित कवींनी आसमंत काव्यप्रेमींचे या काव्यसंग्रहानंतर अगदी अल्पावधीतच भरघोस प्रतिसाद देऊन हे काव्यसंग्रह संपन्न केले आहे. प्रातिनिधिक काव्यसंग्रह म्हणजे खरतर एक कवी संमेलनच असत. एकाच संग्रहात महाराष्ट्रातील कवी कवयित्री एकत्र येऊन कवितांचा आस्वाद घेत आपला आनंद व्यक्त करत असतात.

'अष्टाक्षरी' प्रातिनिधिक काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचा मानस काव्यप्रेमी शिक्षक मंच ग्रुपवर अष्टाक्षरी स्पर्धेच्या माध्यमातून निर्माण झाला.

अष्टाक्षरी बाबत थोडक्यात सांगायचे म्हटले तर पादाकुलक छंद या छंदाला साध्या सोप्या भाषेत अष्टाक्षरी असे म्हणतात. जरी त्याचे मूळ नाव पादाकुलक असे असले तरी अष्टाक्षरी हेच नाव आता प्रचलित आहे.

अष्टाक्षरी रचनेत एका चरणात आठ अक्षरे असतात आणि चार चार अक्षरांचे दोन गण यात रचलेले असतात. छंद अत्यंत सोपे सुलभ आणि गोड असते. प्रत्येक ओळीत आठ अक्षर आणि चार ओळींच्या चरणात दुसऱ्या आणि चौथ्या ओळींचे यमक एवढीच या छंदाचे मागणे आहे. अत्यंत गोड, हळवी, प्रेमळ गीते या छंदात लिहिली गेली आहेत. उदाहरणार्थ- बहिणाबाईंच्या अष्टाक्षरी रचना पुढील प्रमाणे आपणास दिसनू येते. माणसाचं मन कसं आहे.

मन वढाय वढाय
उभ्या पिकातलं ढोर
किती हाकला हाकला
पुन्हा येतं पिकावर

मन ओढाळ जनावारासारखं आहे असं एक साध विधान त्यांनी केललं नाही. 'उभ्या पिकातलं ढोर' हा दृष्टांत देऊन त्यांनी मनाच्या ओढाळपणाची प्रचिती आणून दिलेली आहे. पिकात शिरलेल्या ढोराला कितीही हाकललं तरी ते पुन्हा पुन्हा पिकाकडे धाव घेते.

मन मोकाट मोकाट
त्याले ठायी ठायी वाटा
जशा वाऱ्यानं चालल्या
पान्या वरल्या रं लाटा

मन मोकाट आहे हे सांगताना 'ठायी ठायी वाटा' हे शब्द वापरलेले आहेत. हे मोकाट मन हजार वाटांनी धावत सुटतं, मनाचं हे जाणं कसं आहे, पाण्यावरच्या लाटा जशा वाऱ्याबरोबर जातात तसं. स्वामी मालिका आठवतेय नां

माझे मन तुझे झाले
तुझे मन माझे झाले
तुझे प्राण माझे प्राण
उरले ना वेगळाले

वरील अष्टाक्षरी रचना वाचताना किती अत्यानंद होतो याचा भास येथे जाणवतो. अशा प्रकारे या काव्यसंग्रहात देखील सर्वच कवींनी आपल्या शब्दपैलूंच्या माध्यमातून अष्टाक्षरी काव्यसंग्रहात आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

काव्यप्रेमी शिक्षक मंच आयोजित, घाटंजी जि. यवतमाळ येथे पाचव्या राज्यस्तरीय काव्य महोत्सवानिमित्त अष्टाक्षरी प्रातिनिधिक काव्यसंग्रह प्रकाशित करत असताना या मंचचे राजाध्यक्ष व समूह प्रशासक तसेच अष्टाक्षरीचे मार्गदर्शक मा.श्री. आनंदजी घोडके सर व मा. दीपक सपकाळ तसेच सचिव कालिदास चवडेकर सरांचेही अत्यंत मोलाचे सहकार्य लाभले. महाराष्ट्रातील सर्वच कवी कवयित्रींनी अगदी मनापासून यात जो सहभाग दर्शविला तसेच दर्जेदार प्रथमच अष्टाक्षरी काव्यसंग्रह बनविण्यास सहकार्य करणाऱ्या राज्य समितीच्या सर्व सदस्यांचे व कवींचे मी आभार व्यक्त करतो.

सदर काव्यसंग्रहासाठी अहोरात्र कष्ट घेऊन अप्रतिम पुस्तक निर्माण करण्यासाठी रत्नप्रिया प्रकाशन संस्थेचे श्री. आनंद घोडके व काव्यसंग्रहाचे मुखपृष्ठ व मलपृष्ठ निर्माण करण्यासाठी व अक्षर जुळवणीसाठी मेहनत घेणारे प्रदीप कोडगीमठ, मुद्रक सचिन ऑफसेट व अष्टाक्षरी प्रातिनिधिक काव्यसंग्रहास प्रसिध्दी मिळवून देणारे सर्व पत्रकार व वर्तमान पत्रे यांचेही मी आभार व्यक्त करतो हा प्रातिनिधिक काव्यसंग्रह सर्वच नवोदित कवी विद्यार्थी, शिक्षक, वाचक, लेखक व रसिक मनांवर प्रभाव टाकेल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

प्रा. सत्येंद्र राऊत
संपादक
जवाहर महाविद्यालय, अणदूर

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १ | महिमा - आर्यन राऊत, अणदूर | १ |
| २ | माय मराठी - श्रीमती दिपमाला खडके, अणदूर | २ |
| ३ | जयघोष - विजया पाटील, नंदुरबार | ३ |
| ४ | हरवली माणुसकी - मनीषा रायजादे, सांगली | ४ |
| ५ | बाप - सारिका पाटील, कोल्हापूर | ५ |
| ६ | शेतकरी बाप - कल्याण श्रावस्ती, सोलापूर | ६ |
| ७ | होता मिलन दोघांचे - सौ. जया नेरे, नंदुरबार | ७ |
| ८ | लेक लाडकी बापाची - श्री. ज्ञानेश्वर गायके, खामगाव | ८ |
| ९ | प्रयत्न - कु. संहिता राऊत, अणदूर | ९ |
| १० | माय मराठी - रविंद्र गिमोणकर, नागपूर | १० |
| ११ | बळी पिकवतो मोती - श्री. युवराज जगताप, बार्शी | ११ |
| १२ | माय मराठी - संजय कान्हव, नाशिक | १२ |
| १३ | बरस रे मेघ राजा - दीपक सपकाळ, घाटंजी जि. यवतमाळ | १३ |
| १४ | साजणी - श्री. प्रमोद धना बाविस्कर, कल्याण | १४ |
| १५ | सय माहेराची - सुरेखा इंगळे, बीड | १५ |
| १६ | चवथी भाकर - सु.पु. अढाऊकर | १६ |
| १७ | मागणे - डॉ. माधुरी भोसले, सोलापूर | १७ |
| १८ | अंगाई - राजेश चौरपगार, अमरावती | १८ |
| १९ | माझी विठू माऊली - गणेश खडके, अमरावती | १९ |
| २० | व्यथा ही बळीराजाची - श्रीमती सुप्रिया दापके, हिंगोली | २० |
| २१ | एक अनाहूत भिती - आश्विनी धाट, उस्मानाबाद | २१ |
| २२ | पेरणी - द. रा. गोसावी, खामगांव, बुलढाणा | २२ |
| २३ | सेवेसाठी.... - डॉ. भोजराज लांजेवार, पुणे | २३ |
| २४ | भारतीव संस्कृती - निशा डांगे, पुसद | २४ |
| २५ | तूच माझी माय उल्का - सूरज अंगुले, जळकोट | २५ |
| २६ | खोल दरी विज्ञानाची - प्रियांका शिंदे जगताप, डोंबिवली | २६ |
| २७ | शाळा - ऊर्मिला माने | २७ |
| २८ | बाबा तुमच्या विना हे... - अंगद भुरे, लातूर | २८ |
| २९ | दाह तुझ्या विरहाचा - लक्ष्मीपुत्र उप्पीन, नंदुरबार | २९ |
| ३० | मृतात्मा - सौ. वर्षा मनोज भांदर्गे, अमरावती | ३० |
| ३१ | सपान - भाऊसाहेब कोळेकर, उस्मानाबाद | ३१ |
| ३२ | बाप वेगळंच जग । - राज भिंगारे | ३२ |
| ३३ | देवा तुहया भेटीसाठी - विजय सानप, औरंगाबाद | ३३ |
| ३४ | अर्धांगिनी - रामदास देशमुख, तामसी | ३४ |
| ३५ | परिभाषा - साक्षी संतोष कुलकर्णी | ३५ |
| ३६ | हात तुझा माझ्या हाती - पंडित वराडे, औरंगाबाद | ३६ |
| ३७ | दिस येतील सुखाचं - संतोष बोंगाळे, सोलापूर | ३७ |
| ३८ | मितवा - जयश्री चव्हाण, पुलगाव | ३८ |
| ३९ | मैत्रा - द.ल. वारे, बीड | ३९ |
| ४० | गाऊ आरती - सौ. वीणा माच्छी, पालघर | ४० |
| ४१ | मृगजळ - खाजाभाई बागवान, सोलापूर | ४१ |
| ४२ | जीवनाचे सार - स्मिता मुराळी, सोलापुर | ४२ |
| ४३ | नारी आणि नाती - सौ. सरला राहुल साळुंखे, नंदुरबार | ४३ |
| ४४ | आठोनिच्या झुल्यावर - रवींद्र दळवी, नाशिक | ४४ |
| ४५ | अंकुर - सौ. मोहिनी शिंदे, सोलापूर | ४५ |
| ४६ | अरे पावसा पावसा - भगवान विशे, ठाणे | ४६ |
| ४७ | रान भिजलंच नाही..। - पी. नंदकिशोर, अकोला | ४७ |

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| ४८ | पाऊल पुढे टाकावे - राष्ट्रपाल सावंत, रत्नागिरी | ४८ |
| ४९ | मित्र - आनंद घोडके, सोलापूर | ४९ |
| ५० | सेवा निस्वार्थ मनाची..!! - संतोषकुमार ऊईके, चंद्रपूर | ५० |
| ५१ | प्रीतीचा दुरावा - प्रा. सत्येंद्र राऊत, अणदूर | ५१ |
| ५२ | स्त्रीभ्रूणहत्या - विजय फडणीस, ठाणे | ५२ |
| ५३ | बिजांकूर - सौ. मालती सेमले, गडचिरोली | ५३ |
| ५४ | अष्टाक्षरी रचना - कृष्णा शिंदे, अक्कलकोट | ५४ |
| ५५ | झाकोळ - प्रदीप देशमुख, चंद्रपूर, | ५५ |
| ५६ | ओझे - सुचिता जोशी (कुलकर्णी) ,जि.जालना, | ५६ |
| ५७ | कर्तव्य - प्रिया मयेकरउल्हासनगर-ठाणे | ५७ |
| ५८ | शब्द - पांचाळ रेणुका, वसमत | ५८ |
| ५९ | पहाट - साधनाताई चौधरी, घाटंजी | ५९ |
| ६० | सोबती - सौ. वीणा जोशी, अमरावती, | ६० |
| ६१ | सोनेरी महाल - डॉ. शिवकन्या साबळे, मुरुड | ६१ |
| ६२ | भाऊ राया - पूजा राऊत, उस्मानाबाद | ६२ |
| ६३ | नवे गाणे - प्रमोद घाटोळ, अमरावती | ६३ |
| ६४ | मन वेडावले फार - पांडुरंग टेळे, उस्मानाबाद | ६४ |
| ६५ | स्वार्थी दुनिया - सौ. गीता भागवत, पंढरपूर | ६५ |
| ६६ | बळीराजाची व्यथा - श्याम स्वामी, हिंगोली | ६६ |
| ६७ | माझा संसार - जयवंत वानखडे, चंद्रपूर | ६७ |
| ६८ | अरे काळया विठया ऐक - नवनाथ खरात, सोलापूर, | ६८ |
| ६९ | मन - वंदना सलवदे | ६९ |
| ७० | श्रावण - कवी लक्ष्मण खडके, लातूर | ७० |
| ७१ | गारपीट - सौ. अपर्णा सोवळे, यवतमाळ | ७१ |
| ७२ | सपनं - विजय बिंदोड, यवतमाळ | ७२ |
| ७३ | गजर - श्याम चौकडे, भातकूली | ७३ |
| ७४ | वारा... - नवनाथ गाडेकर, मंचर | ७४ |
| ७५ | आई - खुशाल गुल्हाने, अमरावती | ७५ |
| ७६ | सूर - दिलीप जाने, जळगाव | ७६ |
| ७७ | पंचनामा - कालिदास चवडेकर | ७७ |
| ७८ | बळी पिकवितो मोती - अशोक वरूडे, संगमनेर | ७८ |
| ७९ | बाप - गणेश पुंडे, लातूर | ७९ |
| ८० | आदिवासी - विजयकुमार धोत्रे, लातूर | ८० |
| ८१ | सहचरी - सौ. प्रीती गोगटे, यवतमाळ | ८१ |
| ८२ | बळीराजा - प्रमोद भागवत, अमरावती | ८२ |
| ८३ | शोध स्वतःचा - कु. अरूणा कोरे | ८३ |
| ८४ | सागर - कु. अर्पणा कोरे | ८४ |
| ८५ | बोले प्लास्टीक पिशवी - हेमंत रत्नपारखी, मंगळवेढा | ८५ |
| ८६ | भाऊराया - प्रेमलता शाबादे | ८६ |
| ८७ | विठू रायाच्या दर्शना - श्रीमती सत्यशिला कलशेट्टी, लातूर | ८७ |
| ८८ | नाते - सौ. निर्मला कुलकर्णी, सोलापूर | ८८ |
| ८९ | शाळा नकोच शाळेत - भाऊसाहेब सोनवणे | ८९ |
| ९० | भारतीय संस्कृती - पालिकचंद बिसने, भंडारा | ९० |
| ९१ | आला श्रावण अंगणी - संगीता वाढोणकर | ९१ |
| ९२ | [illegible] बाप्पाची - श्रीमती अर्चना घोडके, लातूर | ९२ |
| ९३ | समाजवाद - प्रा. सत्येंद्र राऊत, अणदूर | ९३ |


Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

# प्रीतीचा दुरावा

जीव होता तुझ्यावर
वेडा होतो तुझ्यासाठी
खूप सहन केलो मी
खोट्या तुझ्या प्रेमापोटी

ओसरल्या धारा माझ्या
डोळ्यातून क्षणोक्षणी
मन कसं क्रूर तुझं
नाही भिजली पापणी

खोटे होते प्रेम तुझे
होता बाजार स्वार्थाचा
गळा दाबून प्रेमाचा
अंत केला भावनांचा

तळमळे मन माझे
नाही कुठेच विसावा
आता मात्र सहावेना
तुझ्या प्रीतीचा दुरावा

खूप खस्ता खाल्लया आज
आता नको आस तुझी
अखेरच्या श्वासातही
नको करू चिंता माझी



# स्त्रीभ्रूणहत्या

रोखलेली... स्त्रीभ्रूणहत्या...

आईशी त्या गूजगोष्टी,
होईन मी खूप मोठी ।
शिकून कमवून मी,
राहीन बाबांच्या पाठी ।। १ ।।

काल पर्यंत हुंदके ,
देणारी माझी माऊली ।
समाजा विरुद्ध आज
अशी पेटून उठली ।। २ ।।

वंशाच्या हव्यासापोटी
विझली असती तिची ।
छोटी हसरी पणती
शिकार अविचाराची ।। ३ ।।

आज आईचे मंजुळ,
स्वर आले माझ्या कानी ।
मला जग दिसणार,
खुश झाले मनोमनी ।। ४ ।।

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad